## आतील पानात वाचा

- मानवतेला काळीमा फासणाऱ्या घटना, थांबणार कधी?
- उंच गणेशमुर्त्यांचे विसर्जन खोल समुद्रातच व्हायला हवे !
- मुख्यमंत्री फडणवीसांचे शाळा परिसर टपरीमुक्त करण्याचे कडक निर्देश...



दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com






वर्ष : ०६ | अंक : ०९, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.२३ ऑगस्ट २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# खवड्या डोंगर प्रकरणात मोठा ट्विस्ट! आयफोनबाबतच्या अफवेचा फुगा फुटला

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२२, छ. संभाजीनगर :** वाळूज परिसरातील खवड्या डोंगरावर आई-वडिलांसह मुलाने दरीत कोसळून केलेल्या आत्महत्येच्या भयंकर घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. या घटनेनंतर सोशल मीडियावर केवळ आयफोन आणि मोबाईलच्या हप्त्यांवरून वाद झाल्याने कुणालने हे टोकाचे पाऊल उचलले अशा चर्चांना प्रचंड उधाण आले होते.

मात्र, या सर्व अफवांचे खंडन करत छत्रपती संभाजीनगरचे पोलीस उपायुक्त रत्नाकर नवले यांनी अत्यंत महत्त्वाचा खुलासा केला आहे. शुक्रवारी घटना घडताच स्थानिकांनी आपत्कालीन क्रमांक ११२ वर संपर्क साधला होता. माहिती मिळताच एमआयडीसी वाळूज पोलीस आणि अग्निशमन दलाचे जवान तातडीने खवड्या डोंगरावर पोहोचले. पोलिसांच्या अंमलदारांनी सलग पाच तास कुणालची समजूत काढण्याचा प्रयत्न केला.

**सोशल मीडियावरील 'आयफोन'च्या अफवांवर विश्वास ठेवू नका**

आयफोन किंवा मोबाईलच्या हप्त्यांवरून कुणालने आत्महत्या केली, असे आपण सध्या अजिबात म्हणू शकत नाही.

आत्महत्येमागे एकच कारण होते की अनेक कौटुंबिक वा आर्थिक कारणे होती, हे पोलीस तपासातूनच उघडकीस येईल. नागरिक आणि सोशल मीडियाने अशा कोणत्याही बिनबुडाच्या अफवांवर विश्वास ठेवू नये, असं आवाहन छत्रपती संभाजीनगरचे पोलीस उपायुक्त रत्नाकर नवले यांनी केलं आहे.



डीसीपी रत्नाकर नवले यांनी दिलेल्या माहितीनुसार, घटनास्थळी पोलीस अंमलदार आणि आई यांच्यात जो संवाद झाला, त्यावरून हा प्रकार केवळ मोबाईलच्या वादातून घडलेला वाटत नाही. आई कुणालला वारंवार तू काही अडचणीत असशील तर आपण ती अडचण सोडवू असे सांगत होती. तिथे जमलेल्या प्रत्यक्षदर्शींपैकी कोणीतरी त्याला शांत करण्यासाठी 'मोबाईल घेऊन देतो' असे विधान केले होते. परंतु, त्या एका वाक्यावरून 'आयफोनसाठीच आत्महत्या केली' या निष्कर्षापर्यंत पोहोचता येत नाही.

**घरात साक्षीदारच उरला नाही; तपासाचे मोठे आव्हान**

या दुर्दैवी घटनेत आई, वडील आणि मुलगा अशा तिघांचाही मृत्यू झाल्यामुळे घरातील खरी वस्तुस्थिती सांगण्यासाठी आता कोणताही साक्षीदार शिल्लक राहिलेला नाही. कुणाल काही कारणास्तव प्रचंड तणावात होता, हे स्पष्ट आहे; मात्र त्याचा वाद नक्की कोणाशी आणि काय कारणावरून झाला होता, हे तपासातच समोर येईल.

## नागपुरात आयुष्मान भारत योजनेत मोठा गैरव्यवहार?




**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२२, नागपूर :** केंद्र सरकारच्या आयुष्मान भारत योजनेअंतर्गत मोफत उपचाराची सुविधा असताना नागपुरातील काही खासगी रुग्णालयांकडून रुग्णांची आर्थिक पिळवणूक केली जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

आजाराच्या उपचारासाठी आणि शस्त्रक्रियेसाठी योजनेतून मंजुरी मिळालेली असताना सुद्धा रुग्णांच्या नातेवाईकांकडून अतिरिक्त ४५ ते ५० हजार रुपयांची मागणी केली जात असल्याचे गंभीर आरोप होत आहेत. यामध्ये स्थानिक रुग्णांसह परराज्यातून आलेल्या गरीब रुग्णांना सर्वाधिक लक्ष्य केले जात आहे.

रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांनी दिलेल्या माहितीनुसार आयुष्मान भारत कार्डवरून उपचाराची मंजुरी मिळाल्यानंतर रुग्ण निर्धास्त होतात. मात्र, प्रत्यक्ष शस्त्रक्रियेपूर्वी संबंधित डॉक्टर किंवा रुग्णालय प्रशासनाकडून एक नवा फंडा वापरला जातो.

ऑपरेशनसाठी लागणारी विशेष मशीन बाहेरून भाड्याने मागवावी लागेल आणि तिचा खर्च आयुष्मान योजनेच्या पॅकेजमध्ये समाविष्ट नाही असे सांगून ४५ ते ५० हजार रुपयांची रोकड मागितली जाते.

विशेष म्हणजे ही रक्कम डॉक्टर थेट स्वतः स्वीकारत नाहीत तर रुग्णालयातील दुसऱ्या कर्मचाऱ्याकडे जमा करण्यास सांगितली जाते. तसेच या अतिरिक्त रकमेची कोणतीही अधिकृत पावती किंवा बिल रुग्णाच्या नातेवाईकांना दिले जात नाही.

ऐनवेळी रुग्णाचा जीव वाचवणे आणि उपचार पूर्ण करणे हेच नातेवाईकांसाठी महत्त्वाचे असते. याच हतबलतेचा गैरफायदा रुग्णालयांकडून घेतला जात आहे. गरीब कुटुंबांसाठी ४५ ते ५० हजार रुपये जमा करणे अत्यंत कठीण असते, तरीही नाईलाजास्तव त्यांना हे पैसे द्यावे लागत आहेत.

जर एखाद्या शस्त्रक्रियेसाठी आयुष्मान योजनेअंतर्गत संपूर्ण पॅकेज मंजूर झाले असेल, तर रुग्णाकडून वेगळे पैसे घेणे वैध आहे का? जर एखादे उपकरण खरोखरच बाहेरून मागवावे लागत असेल तर त्याची पूर्वकल्पना रुग्णाला लेखी स्वरूपात आणि स्पष्ट नियमावलीसह दिली जाते का?

या संपूर्ण प्रकरणाची वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. यामध्ये रुग्णालयांचे आयुष्मान योजनेशी संबंधित रेकॉर्ड, मंजूर झालेले पॅकेज, रुग्णांचे वैद्यकीय बिल आणि प्रत्यक्षात वापरलेली उपकरणे यांची तपासणी करण्याची म ागणी होत आहे. आयुष्मान भारत योजनेचा मूळ उद्देश गरीब आणि गरजू कुटुंबांना आर्थिक सुरक्षा देणे हा आहे. परंतु नागपुरातील या प्रकारामुळे योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीवर आणि रुग्णालयांच्या कारभारावर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणाची तातडीने निष्पक्ष चौकशी करून दोषी रुग्णालयांवर कडक कारवाई करण्याची मागणी नागरिक करत आहेत.

## 'प्रहारी' इंटिग्रेटेड सीसीटीव्ही कमांड सेंटरचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२२, ठाणे :** नवी मुंबईकरांच्या सुरक्षिततेत अधिक भर घालत गुन्हेगारीवर नियंत्रण आणि अत्याधुनिक देखरेखीसाठी सज्ज असलेल्या 'प्रहारी' इंटिग्रेटेड सीसीटीव्ही कमांड सेंटरचे सीबीडी बेलापूर येथील पोलीस आयुक्त कार्यालयात आज मोठ्या उत्साहात लोकार्पण करण्यात आले. या अत्याधुनिक कमांड सेंटरचे उद्घाटन म हाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते पार पडले.




नवी मुंबई पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई महानगरपालिका व पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त सहकार्यातून साकारलेल्या या प्रकल्पाच्या उद्घाटनप्रसंगी राज्याचे वनमंत्री गणेश नाईक व रोजगार हमी मंत्री तथा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री भरत गोगावले यांची विशेष उपस्थिती लाभली. या कार्यक्रमास विधानपरिषद सदस्य रविंद्र फाटक, विधानपरिषद सदस्य विक्रांत पाटील, विधानसभा सदस्य मंदाताई म्हात्रे, महेश बालदी, रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील व पनवेलचे महापौर नितीन पाटील यांच्यासह विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल, ठाणे जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त कैलास शिंदे, नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, पोलीस सह आयुक्त दीपक साकोरे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) प्रमोद शेवाळे आणि पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे, मुंबई महानगरपालिकेचे मुख्य अभियंता शिरीष आरदवाड आदी म ान्यवर उपस्थित होते.

'ऑलवेज वॉचिंग, ऑलवेज प्रोटेक्टिंग' हे ब्रीदवाक्य असलेल्या या 'प्रहारी' प्रणालीमुळे शहरातील प्रत्येक हालचालीवर चोवीस तास बारीक नजर ठेवली जाणार असून वाहतूक नियंत्रण, कायदा व सुव्यवस्था आणि आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी हे केंद्र नवी मुंबई पोलिसांसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे.

## टाकळी ढोकेश्वरच्या बैलगाडा घाटात भिर्रर.. भिर्रर.. ची आरोळी घुमली

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२२, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथे श्री संत सावता माळी महाराज पुण्यतिथी तसेच वै. विठ्ठल महाराज पायमोडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त पारनेर तालुका पठार केसरी बैलगाडा शर्यतीचे भव्य आयोजन करण्यात आले असून पुणे - नगर जिल्ह्यातून बैलगाडा मालक व चालकांनी या शर्यतीत उत्स्फूर्त सहभाग घेतला आहे. आज शनिवारी (दि.२२) रोजी पहिल्या दिवशी१५० हून अधिक बैलगाडा स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. बैलगाडा घाटात भिर्रर ची आरोळी घुमली आणि वातावरण ढोलताशांच्या वाद्यात व तुतारीच्या निनादाने दुमदुमले. बैलगाडा शर्यतींमुळे टाकळी ढोकेश्वरचा परिसरात फुलून गेला होता.

माजी सरपंच शिवाजी खिलारी यांच्या हस्ते कार्यक्रम ाचे उद्घाटन होऊन बैलगाडा शर्यतीस प्रारंभ झाला. आयोजकांच्या वतीने वाजतगाजत बैलांचे स्वागत करण्यात आले. सकाळी सुरुवात झालेली शर्यत संध्याकाळपर्यंत रंगली. पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शर्यतीचा आनंद लुटला. एकाच दिवशी तब्बल १५० हून अधिक बैलगाड्यांनी घाटात दमदारपणे पळाले.



श्री संत सावता माळी महाराज पुण्यतिथीनिमित्त टाकळी ढोकेश्वरमध्ये तीनदिवस आयोजित बैलगाडा शर्यत त्यात दिल्या जाणाऱ्या बक्षिसांमुळे चांगलीच चर्चेत आली आहे. त्याचा परिणाम म्हणून या स्पर्धेसाठी पुणे - नगर जिल्ह्यातून ५०० हून अधिक बैलगाडा मालकांनी टोकन घेतल्याने अनेक बैलगाडा मालक या शर्यतीला हजेरी लावणार आहेत.

यावेळी माजी सरपंच शिवाजी खिलारी, पारनेर तालुका बैलगाडा संघटनेचे अध्यक्ष बाळकृष्ण पायमोडे, मळिभाऊ रांधवण, विक्रमशेठ झावरे, गणेश चव्हाण, पत्रकार वसंत रांधवण,धोडीभाऊ झावरे, नवनाथ पायमोडे, विवेक धुमाळ, शिवाजीराव थोपटे, दत्तात्रय घुले, सोपान माने, किरण झावरे, निलेश धुमाळ, विजय महाराज लोमटे, शिवाजी उंडे, जयसिंग जाधव, अंकुश बर्वे, संतोष आंधळे, अखिल भारतीय बैलगाडा संघटना संचालक पै. अनिकेत शिवाजीराजे उंडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

या तीन दिवसीय शर्यतीतील स्पर्धकांसाठी बक्षीसांची लयलूट असणार आहे. प्रथम क्रमांक विजेत्या बैलगाडा स्पर्धकांना ८१ हजार रुपये व मानाची पठार केसरी ट्रॉफी, व्दितीय क्रमांकासाठी ७३ हजार रुपये, तर तृतीय क्रम ांकासाठी ३१ हजार रुपये रोख पारितोषिक देण्यात येणार आहे. याशिवाय दररोज प्रथम, द्वितीय व तृतीय फळीफोड करणाऱ्या बैलगाडा स्पर्धकांना आकर्षक ट्रॉफी देण्यात येणार आहेत. शर्यतीच्या अंतिम फेरीसाठीही आकर्षक बक्षिसांची घोषणा करण्यात आली आहे. प्रथम फायनल क्रमांकासाठी ३१ हजार रुपये, द्वितीय क्रमांक २२ हजार रुपये, तृतीय क्रमांक १५ हजार रुपये, पाचव्या क्रमांकासाठी ७ हजार रुपये आणि सहाव्या क्रमांकासाठी ५ हजार रुपये अशी बक्षिसांची रचना करण्यात आली आहे. याशिवाय शर्यती दरम्यान उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या बैलगाड्यांसाठी आकर्षक ट्रॉफी व बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. त्यामुळे तीनही दिवस बैलगाडा शर्यतीचा चुरशीच्या शर्यतीत पहायला मिळणार आहेत.

## १३७ कोटींच्या वीर बाबूराव शेडमाके स्टेडियमच्या प्रस्तावाला गती

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२२, चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्यातील क्रीडा क्षेत्राला नवी दिशा देणाऱ्या वीर बाबूराव शेडमाके स्टेडियम, दाताळा येथील १३७ कोटी रुपयांच्या प्रस्तावाला गती मिळाली आहे. आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या ठोस पुढाकारामुळे या प्रस्तावाच्या प्रशासकीय मान्यतेसाठी तातडीने आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, श्री. रणजितसिंह देओल यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या बैठकीत आ. मुनगंटीवार यांनी प्रकल्पाची आवश्यकता, चंद्रपूरच्या क्रीडा विकासातील त्याचे महत्त्व आणि सद्यस्थिती सविस्तरपणे मांडली. यावर प्रधान सचिवांनी सकारात्मक प्रतिसाद देत प्रस्तावाची आवश्यक तपासणी व पूर्तता करून पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. मौजा दाताळा, ता. जि. चंद्रपूर येथे प्रस्तावित वीर बाबूराव शेडमाके स्टेडियमसाठी १३७ कोटी रुपयांचे अंदाजपत्रक व आराखडा प्रस्तावित आहे. चंद्रपूर जिल्ह्यासह पूर्व विदर्भातील खेळाडूंना अत्याधुनिक क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प अत्यंत म हत्त्वाचा असल्याचे आ. मुनगंटीवार यांनी बैठकीत स्पष्ट केले. त्यामुळे प्रस्तावाचा सकारात्मक विचार करून शासनस्तरावर आवश्यक निर्णय घेण्यात यावा, अशी मागणी आ.मुनगंटीवार यांनी केली. चंद्रपूर जिल्ह्यात ग्रामीण आणि आदिवासी भागातील युवकांमध्ये क्रीडा



क्षेत्रात मोठी क्षमता आहे. योग्य प्रशिक्षण, अत्याधुनिक सुविधा आणि आवश्यक व्यासपीठ उपलब्ध झाल्यास हे खेळाडू राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर चंद्रपूरचे नाव उज्ज्वल करू शकतात. या पार्श्वभूमीवर स्टेडियमच्या उभारणीचे महत्त्व आ. मुनगंटीवार यांनी अधोरेखित केले. 'मिशन शौर्य एव्हरेस्ट' अंतर्गत चंद्रपूर जिल्ह्यातील अनेक आदिवासी युवकांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण मिळाले आहे. या मोहिमेतील पाच आदिवासी युवकांनी एव्हरेस्ट शिखर सर केले होते. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीचा पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी स्वातंत्र्यदिनाच्या भाषणात विशेष उल्लेख करून गौरव केला होता. चंद्रपूरच्या युवकांमध्ये असलेली ही क्षमता योग्य क्रीडा पायाभूत सुविधांच्या माध्यमातून आणखी विकसित करता येईल, अशी भूमिका यावेळी मांडण्यात आली.

प्रस्तावित स्टेडियमच्या माध्यमातून 'मिशन ऑलिम्पिक २०३६'साठी चंद्रपूर जिल्ह्यातील नव्या पिढीतील खेळाडू घडविण्याचे व्यापक उद्दिष्ट साध्य करता येणार आहे. अत्याधुनिक सुविधा उपलब्ध झाल्यास ग्रामीण व आदिवासी भागातील प्रतिभावान खेळाडूंना प्रशिक्षणाची योग्य संधी मिळेल आणि राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी आवश्यक तयारी करता येईल. बैठकीत प्रधान सचिव रणजितसिंह देओल यांनी प्रकल्पाबाबत सकारात्मक प्रतिसाद देत प्रस्तावाची आवश्यक तपासणी व पूर्तता करून प्रशासकीय म ान्यतेसाठी तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. शासनस्तरावर प्रकल्पाबाबत सकारात्मक व अनुकूल कार्यवाही करण्याचे आश्वासनही यावेळी देण्यात आले.




## राष्ट्रीय अंतराळ दिवस

२३ ऑगस्ट हा दिवस भारताच्या अंतराळ इतिहासातील सुवर्णाक्षरांनी लिहिला गेलेला दिवस आहे. याच दिवशी, २३ ऑगस्ट २०२३ रोजी, भारताच्या चांद्रयान-३ मोहिमेतील 'विक्रम' लँडरने चंद्राच्या पृष्ठभागावर यशस्वी आणि सुरक्षित सॉफ्ट लँडिंग केले. या ऐतिहासिक कामगिरीनंतर भारत चंद्रावर यशस्वीपणे उतरणारा जगातील चौथा देश आणि चंद्राच्या दक्षिण ध्रुवीय प्रदेशाजवळ पोहोचणारा पहिला देश ठरला. या ऐतिहासिक कामगिरीच्या स्मरणार्थ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २३ ऑगस्ट हा दिवस 'राष्ट्रीय अंतराळ दिवस' म्हणून साजरा करण्याची घोषणा केली.

चांद्रयान-३चे यश हे केवळ एका अंतराळ मोहिमेचे यश नव्हते, तर भारतीय वैज्ञानिकांच्या जिद्दीचे, बुद्धिमत्तेचे, परिश्रमाचे आणि अपयशातून शिकण्याच्या वृत्तीचे प्रतीक होते. २३ ऑगस्ट २०२३ रोजी सायंकाळी ६ वाजून ४ मिनिटांनी चांद्रयान-३चे विक्रम लँडर चंद्रावर उतरले आणि संपूर्ण देशाचा अभिमान उंचावला. त्यानंतर प्रज्ञान रोव्हरने चंद्राच्या पृष्ठभागावर उतरून विविध वैज्ञानिक प्रयोग आणि निरीक्षणे केली. या मोहिमेच्या लँडिंग स्थळाला 'शिव शक्ती पॉइंट' असे नाव देण्यात आले.

भारताच्या या यशामागे अनेक वर्षांची मेहनत आणि सातत्यपूर्ण संशोधन आहे. २००८ मध्ये चांद्रयान-१ मोहिमेने भारताच्या चंद्र संशोधनाला नवी दिशा दिली. त्यानंतर २०१९ मध्ये चांद्रयान-२ मोहिम दरम्यान लँडरचे चंद्रावर अपेक्षित सॉफ्ट लँडिंग होऊ शकले नाही. मात्र ही मोहीम पूर्णपणे अपयशी ठरली नाही. चांद्रयान-२चा ऑर्बिटर यशस्वीपणे कार्यरत राहिला आणि त्याने चंद्राविषयी महत्त्वाची माहिती मिळवून दिली. अपयशाने खचून न जाता त्यातून धडा घेत भारतीय शास्त्रज्ञांनी चांद्रयान-३ची अधिक सक्षम आणि सुरक्षित रचना केली.

यातून एक महत्त्वाचा संदेश मिळतो अपयश हा शेवट नसतो; तो यशाकडे जाणाऱ्या पुढील प्रयत्नांची सुरुवात असतो. चांद्रयान-२च्या अनुभवातून मिळालेले धडे चांद्रयान-३मध्ये उपयोगी ठरले. लँडिंगच्या वेळी येऊ शकणाऱ्या विविध तांत्रिक अडचणींचा विचार करून यानाची रचना करण्यात आली. भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या (इस्रो) शास्त्रज्ञांनी घेतलेल्या अथक परिश्रमामुळे भारताने जगासमोर आपल्या वैज्ञानिक सामर्थ्याची प्रभावी साक्ष दिली.

चांद्रयान-३च्या यशामुळे भारताची अंतराळ क्षेत्रातील प्रतिष्ठा निश्चितच वाढली. मात्र या यशाकडे केवळ अभिमानाची बाब म्हणून पाहून चालणार नाही. अंतराळ तंत्रज्ञानाचा उपयोग हवामानाचा अंदाज, दळणवळण, शेती, आपत्ती व्यवस्थापन, नेव्हिगेशन, शिक्षण, आरोग्य आणि राष्ट्रीय विकासासाठी मोठ्या प्रमाणावर होत आहे. त्यामुळे अंतराळ संशोधन हे केवळ अवकाशातील मोहिमांपुरते मर्यादित न राहता सामान्य माणसाच्या जीवनाशी जोडले गेले आहे.

आज भारत गगनयानासारख्या मानव अंतराळ मोहिमांच्या दिशेने पुढे जात आहे. चंद्र, मंगळ आणि त्यापलीकडील अंतराळाचा अभ्यास करण्यासाठी भारतीय शास्त्रज्ञ नवनवीन प्रयोग करीत आहेत. या प्रवासात देशातील तरुण पिढीला विज्ञान, तंत्रज्ञान आणि संशोधनाकडे आकर्षित करणे ही काळाची गरज आहे. राष्ट्रीय अंतराळ दिवसाचा खरा उद्देशही याच वैज्ञानिक दृष्टिकोनाला प्रोत्साहन देणे हा आहे.

एकेकाळी भारताकडे वैज्ञानिक आणि तांत्रिकदृष्ट्या मर्यादित साधने असताना आज त्याच भारताने अत्यंत कमी खर्चात उल्लेखनीय अंतराळ मोहिमा यशस्वी करून दाखवल्या आहेत. हे यश केवळ इस्रोचे नाही; ते भारतातील प्रत्येक वैज्ञानिक, अभियंता, तंत्रज्ञ, संशोधक, विद्यार्थी आणि देशाच्या वैज्ञानिक प्रगतीवर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येक भारतीयाचे आहे.

राष्ट्रीय अंतराळ दिवस हा केवळ चांद्रयान-३च्या यशाचा उत्सव नाही, तर वैज्ञानिक दृष्टिकोन, आत्मनिर्भरता, संशोधनाची जिद्द आणि 'अशक्य वाटणाऱ्या गोष्टी शक्य करण्याच्या' भारतीय वृत्तीचा उत्सव आहे. चंद्रावर तिरंगा फडकवणाऱ्या भारताने आता अंतराळ क्षेत्रातील पुढची क्षितिजे गाठण्याची तयारी केली आहे. ही अंतराळ भरारी अधिक उंच जावी, भारतीय तरुणांच्या हातून नवनवीन वैज्ञानिक क्रांती घडावी आणि भारताचे नाव अंतराळ संशोधनात सदैव अग्रस्थानी राहावे, हीच राष्ट्रीय अंतराळ दिनानिमित्त अपेक्षा!

चंद्रावर तिरंगा फडकवून अंतराळ क्षेत्रात नवी क्षितिजे गाठणाऱ्या सर्व भारतीयांना राष्ट्रीय अंतराळ दिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

**- श्याम ठाणेदार**

# उंच गणेशमुर्त्यांचे विसर्जन खोल समुद्रातच व्हायला हवे !

सार्वजनिक गणेशमूर्ती विसर्जनाबाबत अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेला निर्णय उच्च न्यायालयाने अखेर दिला आहे. उच्च न्यायालयाने २४ जुलै २०२५ ला दिलेला अंतरिम आदेश तूर्तास कायम ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. या आदेशानुसार ६ फुटांपर्यन्तच्या गणेशमूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावांत करणे बंधनकारक असणार आहे, तर ६ फुटांपेक्षा अधिक उंची असलेल्या गणेशमूर्त्या समुद्र आणि नैसर्गिक जलस्रोतांत विसर्जित करण्याची परवानगी देण्यात आली आहे. गणेशोत्सव हा मुंबईतील सर्वांत मोठा उत्सव. गणेशोत्सवाला राज्य सरकारने नुकतेच 'राज्य महोत्सव' म्हणून घोषित केले आहे.

गणेशोत्सव काळात गिरगाव, लालबाग आणि परळ या भागांत रात्रीचा दिवस झालेला असतो. सर्वत्र विद्युत रोषणाईचा झगमगाट आणि गणेशभक्तांची वर्दळ या दहा दिवसांत दिसून येते. भक्ती आणि जल्लोष यांचा संगम असलेला हा उत्सव पाहण्यासाठी, त्याचा आनंद लुटण्यासाठी आणि मनात त्याच्या आठवणी कायमच्या कोरण्यासाठी हजारो विदेशी पर्यटक या दिवसांत मुंबईत दाखल होतात. गणेशभक्तांना आकर्षित करण्यासाठी मुंबईतील अनेक मंडळांत उंच गणेशमूर्ती आणण्याची प्रथा गेल्या काही वर्षांपासून पडली आहे. काही मंडळे सजावटीवर अधिक खर्च न करता मंडळात केवळ उंच मूर्ती बसवण्यावर भर देतात. मुंबईतील हा उत्साह पाहून गेल्या काही वर्षांपासून अथांग समुद्र किनारा लाभलेल्या मुंबई बाहेरील जिल्ह्यांतही उंच मुर्त्या बसवण्यात



येऊ लागल्या आहेत. गणेशमुर्त्यांच्या उंचीबाबत बाजूबाजूच्या मंडळांमध्ये दरवर्षी स्पर्धा रंगलेली पाहायला मिळते. वर्तमानपत्र, वृत्तवाहिन्या यांमध्ये या उंच मुर्त्यांची छायाचित्रे झळकत असल्याने त्या जवळून पाहण्यासाठी गणेशभक्त मित्रमंडळी आणि नातेवाईकांसह तासनतास रांगेत उभे राहतात. १० दिवस मंडपात राजासमान विराजमान झालेल्या श्री गणेशमूर्ती विसर्जनाचा दिवस जेव्हा येतो तेव्हा तिला समुद्रापर्यंत नेण्यासाठी कार्यकर्त्यांना चांगलीच कसरत करावी लागते. रस्त्यातील अडथळे आणि गर्दीतून वाट काढत श्रींची मूर्ती समुद्रापर्यंत आणताना त्यांची चांगलीच दमछाक होते. उंच गणेशमूर्त्या खरेतर खोल समुद्रात विसर्जित करणे अपेक्षित असते; मात्र अनेक मंडळे विसर्जनाच्या वेळी मुर्त्या अर्ध्या पाण्यात अक्षरशः ढकलून पाडतात. त्या बुडण्यासाठी कार्यकर्ते मुर्त्यांवर उभे राहतात. त्यांचे पूर्णपणे विसर्जन झाले कि नाही याकडे मागे वळून न पाहता तिथून पळ काढतात.

तर काही मंडळे उंच मुर्त्या तशाच अर्धवट पाण्यात सोडून निघून जातात. ओहोटीच्या वेळी पाणी किनाऱ्यापासून दूर गेल्यावर या मुर्त्या समुद्र किनाऱ्यावर तशाच उभ्या असलेल्या दिसून येतात. अनेक मुर्त्यांचे भग्न अवशेष किनाऱ्यावर आलेले पाहायला मिळतात. ज्या गणेशमूर्तीमध्ये प्रत्यक्ष श्रीगणेश विराजमान आहेत या भावाने आपण १० दिवस तिची मनोभावे पूजा करतो, त्या मूर्तीची विसर्जनाच्या वेळेस होणारी अवहेलना कोणत्याही गणेशभक्तांच्या डोळ्यात पाणी आणणारी असते. लक्षावधी गणेशभक्तांचे श्रद्धास्थान असणाऱ्या लालबागच्या राजा गणेशोत्सव मंडळातील श्रीच्या मूर्तीचे विसर्जन दरवर्षी तराफांच्या साहाय्याने खोल समुद्रात केले जाते. तो दिव्य सोहळा पाहताना आणि बाप्पाला निरोप देताना अनेकांच्या डोळ्याचे पारणे फिटते. मागच्या वर्षी काही तांत्रिक कारणामुळे विसर्जनाला विलंब झाला तरी मंडळाने मूर्ती विसर्जनाबाबत कोणतीही तडजोड केली नाही. जर लालबागच्या राजा मंडळाच्या उंच मूर्तीचे विसर्जन खोल समुद्रात केले जाऊ शकते तर इतरांना ते का शक्य नाही. ज्यांना उंच गणेशमुर्त्यांचे विसर्जन विधिवत आणि भावपूर्ण करता येत नसेल अशा मुर्त्यांनी उंच गणेशमूर्त्या बसवून श्रीगणेशाची अवहेलना तरी करू नये. श्रीगणेशमूर्ती ही सजावटीची किंवा देखाव्याची वस्तू नव्हे, जी दहा दिवस सजवून मंडपात बसवली आणि अनंत चतुर्दशीला समुद्रावर सोडून दिली. गणेश भक्तांच्या श्रद्धेमुळे गणेशोत्सवादरम्यान गणेशमुर्तीमध्ये श्री गणेशाचे तत्व मोठ्या प्रमाणात अवतरित झालेले असते त्यामुळे त्या मूर्तीचा योग्य तो आदर-सन्मान राखला जायला हवा. तिचे विसर्जन शास्त्रशुध्दच व्हायला हवे अन्यथा श्री गणेशाच्या कृपेपेक्षा अवकृपेसच आपण पात्र होऊ.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

## सात धरणक्षेत्रातील गाळ काढण्यास विनाशुल्क परवानगी...
## सरकारचे मोठे पाऊल !

राज्यातील अनेक धरणात पावसाळ्याच्या दिवसात गोटे, माती रेती असे अनेक घटक वाहत येतात व ते धरणातील पाण्यात मिसळतात. वर्षानुवर्धे हे प्रक्रिया चालू असल्याने अनेक धरणे गाळानी भरली आहेत. साहजिकच त्यामुळे धरणाची पाणी साठविण्याची क्षमता कमी होत आहे. आता जलसंपदा विभागणी एक सूचना जारी करून विनाशुल्क धरणातील गाळ काढण्यास मंजुरी दिली आहे ही बातमी नुकतीच वाचली सोलापूर जिल्ह्यातील उजनी, सातारा जिल्ह्यातील कोयना, गिरणा, गोसीखुर्द, मुळा, जायकवाडी, व हतनूर या सात धरणाचा यात समावेश करण्यात आला आहे. या आदेशामुळे आता शेतकरी किंवा अशासकीय संस्था यांना ना हरकत प्रमाणपत्राची गरज नाही. तसेच हा गाळ विनाशुल्क काढता येणार आहे. या योजनेमुळे धरणाची पाणी साठवण क्षमता वाढणारआहे. गाळामध्ये अनेक सेंद्रिय घटक असल्याने जमिनीची सुपीकता वाढीस लागण्यास मदत होणार आहे यामुळे ग्रामीण अर्थव्यस्था सुद्धा बळकट होईल अशी अपेक्षा आहे. या निर्णयामुळे अनेक शेतकऱ्यांचा फायदा होणार असून त्यांना दिलासा मिळाला आहे. सरकारचा हा निर्णय स्तुत्य असून त्यामुळे शेतीचा फायदाच होणार आहे. तसेच धरणाची पाणी साठविण्याची क्षमता सुद्धा वाढणार आहे.

**- शांताराम वाघ, पुणे**

## तुकाराम होणं अवघडच

एक तुका होता
अभंगातून सत्य बोलणारा,
विठ्ठलाच्या चरणी
मनाचा दीप ठेवणारा

दुसरा तुका आज
व्यवस्थेच्या वाटेवर चालतो,
अन्यायाच्या सावलीला
निर्भयपणे दूर सारतो

एकाच्या ओठी
नामाचा गजर होता,
दुसऱ्याच्या कृतीत
कर्तव्याचा हुंकार होता

एकाने शब्दांनी
मनं जागी केली,
दुसऱ्याने कर्मांनी
व्यवस्था जागी केली

दोघांच्याही वाटेवर
काटे होते असंख्य,
तरी सत्याच्या पाऊलवाटेवर
निश्चय होता अभंग

एक म्हणाला... सत्य बोलू,
जरी जग रुसलं तरी

दुसरा जणू कृतीतून सांगतो
कर्तव्य करू,
जरी व्यवस्था नाराज झाली तरी

नाही पदाचा गर्व,
नाही मानाची आस,
जनहित हाच धर्म,
कर्तव्य हाच श्वास

एकाने समाजाला
अंतर्मुख व्हायला शिकवलं,
दुसऱ्याने प्रशासनाला
जबाबदार व्हायला शिकवलं

काळ वेगळा,
वाट वेगळी,
पण अंतरीचा दीप तोच
सत्यासाठी उभं राहणं,
आणि जनतेसाठी जगणं

एक संतत्वाने मोठा,
एक कर्तृत्वाने महान,
एकाने दिला विचारांचा वारसा,
दुसऱ्याने कृतीतून दिला प्रमाण

नाव एकच असणं
हा केवळ योगायोग असेल,
पण त्या नावाचा अर्थ जगणं
हीच खरी कसोटी असेल

म्हणूनच मन म्हणतं...

तुकाराम नाव धारण करणं सोपं,
पण तुकाराम होणं अवघडच

एकाच्या हाती अभंग,
दुसऱ्याच्या हाती प्रशासन
दोघांच्या अंतरी मात्र
माणूस, माणुसकी आणि जनकल्याण

**- कीर्तिराज शैलेंद्र आगलावे, पुणे,**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# मानवतेला काळीमा फासणाऱ्या घटना थांबणार कधी?

पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील पिंपळवंडी येथे एका अल्पवयीन शाळकरी मुलीवर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या केल्याची संतापजनक घटना नुकतीच घडली. या घटनेने पुणे जिल्हाच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. माणुसकीला काळिमा फासणाऱ्या या घटनेमुळे पुरोगामी महाराष्ट्राची प्रतिमा पुन्हा एकदा प्रश्नांकित झाली आहे. एका निष्पाप मुलीचे आयुष्य अशा प्रकारे संपवले जाणे ही केवळ एका कुटुंबाची शोकांतिका नसून संपूर्ण समाजाच्या संवेदनशीलतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी घटना आहे.

महाराष्ट्रात अशा घटना घडण्याची ही पहिलीच वेळ नाही. काही दिवसांपूर्वी महाराष्ट्र दिनी पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर येथे एका चार वर्षीय चिमुरडीवर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या करण्यात आली होती. त्याच दिवशी चाकणजवळील महाळुंगे येथे एका अल्पवयीन मुलावर गंभीर लैंगिक अत्याचार करून त्याची हत्या झाल्याची घटना समोर आली होती. या दोन्ही घटनांनी महाराष्ट्र हादरून गेला होता. त्याआधी बदलापूरमधील शाळकरी मुलींवरील अत्याचाराच्या घटनेनेही राज्याच्या विवेकाला धक्का दिला होता. कोपर्डीची घटना तर आजही महाराष्ट्राच्या स्मरणात आहे. पिंपळवंडी, नसरापूर, महाळुंगे, बदलापूर आणि कोपर्डी या घटना वेगवेगळ्या ठिकाणी घडल्या असल्या तरी त्यामागील विकृत मानसिकता आणि समाजासमोरील प्रश्न समान आहेत. या घटना केवळ गुन्हेगारीच्या घटना म्हणून पाहून चालणार नाही. महिला आणि बालकांच्या सुरक्षेबाबत आपण कुठे कमी पडत आहोत, याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे.

पिंपळवंडीतील घटनेनंतर संतप्त नागरिक रस्त्यावर उतरले. आरोपीला कठोरात कठोर शिक्षा मिळावी, अशी मागणी होत आहे. पोलिसांनी आरोपीला तातडीने अटक केल्याने तपासाच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल उचलले गेले असले तरी नागरिकांचा संताप स्वाभाविकपणे कायम आहे. अशा प्रकरणांत आरोपीला अटक होणे ही सुरुवात आहे; न्याय मिळणे ही अंतिम कसोटी आहे. तपास निष्पक्ष, जलद आणि पुराव्यांवर आधारित असला पाहिजे आणि दोष सिद्ध झाल्यास आरोपीला कायद्यानुसार कठोर शिक्षा झाली पाहिजे.

मात्र प्रत्येक वेळी घटना घडल्यानंतर आरोपीला अटक करणे, चौकशीचे आदेश देणे आणि कठोर शिक्षेची घोषणा करणे एवढ्यावरच शासनाची जबाबदारी संपत नाही. अशा घटना घडूच नयेत यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे अधिक महत्त्वाचे आहे. पोलिसांनी संवेदनशील भागात गस्त वाढवणे, शाळा व सार्वजनिक ठिकाणी सुरक्षा व्यवस्था मजबूत करणे, बालसुरक्षा यंत्रणा सक्षम करणे आणि महिलांच्या तक्रारींची तातडीने दखल घेणे आवश्यक आहे.

पिंपळवंडी प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर यापूर्वी गंभीर गुन्ह्यांत आरोपी असलेल्या व्यक्तींवर कायदेशीर प्रक्रियेनुसार योग्य देखरेख आणि प्रतिबंधात्मक उपाय झाले होते का, याचाही तपास झाला पाहिजे. गंभीर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींकडून पुन्हा गुन्हा घडू नये यासाठी संबंधित यंत्रणांनी काय उपाय केले, याची जबाबदारी निश्चित होणे गरजेचे आहे. एखाद्या यंत्रणेच्या निष्काळजीपणामुळे एखाद्या निष्पाप जीवाला किंमत मोजावी लागली असेल, तर त्या निष्काळजीपणावरही कठोर कारवाई झाली पाहिजे. कायद्याचा धाक निर्माण करण्यासाठी शिक्षा निश्चित होणे आणि ती वेळेत होणे अत्यंत आवश्यक आहे. मात्र केवळ कठोर शिक्षा हा या समस्येवरील एकमेव उपाय नाही. महिलांकडे आणि मुलींकडे व्यक्ती म्हणून नव्हे, तर उपभोग्य वस्तू म्हणून पाहणारी विकृत पुरुषी मानसिकता बदलणे तितकेच गरजेचे आहे. घर, शाळा आणि समाज या तिन्ही पातळ्यांवर मुलांना स्त्रीचा सन्मान, समानता, संमती आणि मानवी प्रतिष्ठेचे संस्कार दिले पाहिजेत. शिव, शाहू, फुले आणि आंबेडकरांच्या विचारांनी समृद्ध झालेल्या महाराष्ट्रात महिला आणि बालकांच्या सुरक्षेचा प्रश्न वारंवार निर्माण होणे ही निश्चितच चिंतेची बाब आहे. तीन-चार वर्षांच्या चिमुरडीपासून ते वृद्ध महिलेपर्यंत कोणतीही महिला किंवा मुलगी असुरक्षित वाटत असेल, तर आपण पुरोगामी असल्याचा दावा कितपत योग्य आहे, याचा विचार समाजाने करायला हवा. शाळा, महाविद्यालये, कामाची ठिकाणे, सार्वजनिक वाहतूक, सार्वजनिक ठिकाणे आणि घराच्या आसपास महिलांना सुरक्षित वातावरण मिळणे ही सरकारचीच नव्हे, तर संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे. महिला सुरक्षेसाठी केवळ कायदे करून उपयोग नाही; त्या कायद्यांची प्रभावी अंमलबजावणीही झाली पाहिजे. महाराष्ट्राची तुलना कोणत्याही राज्याशी करून आपली जबाबदारी झटकता येणार नाही. उलट महाराष्ट्राने महिला आणि बालसुरक्षेचे देशासमोर आदर्श उदाहरण निर्माण करणे गरजेचे आहे. गुन्हा घडल्यानंतर आरोपीला शिक्षा मिळणे आवश्यक आहेच; पण त्यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे गुन्हा घडण्यापूर्वी तो रोखणे.

पिंपळवंडीतील निष्पाप मुलीला गमावल्याचे दुःख केवळ तिच्या कुटुंबाचे नाही, तर संपूर्ण महाराष्ट्राचे आहे. अशा प्रत्येक घटनेनंतर संताप व्यक्त करून काही दिवसांनी सर्व विसरून जाण्याची मानसिकता आता बदलली पाहिजे. या घटनांच्या मुळाशी जाऊन विकृत मानसिकता, कायद्याची अंमलबजावणी आणि सुरक्षा यंत्रणेतील त्रुटी दूर करण्यासाठी ठोस पावले उचलली पाहिजेत.महाराष्ट्र खऱ्या अर्थाने पुरोगामी तेव्हाच म्हणता येईल, जेव्हा या भूमीवर जन्मलेली प्रत्येक मुलगी निर्भयपणे शाळेत जाईल, सुरक्षितपणे घरी परतेल आणि प्रत्येक महिला सन्मानाने जगू शकेल. मानवतेला काळिमा फासणाऱ्या घटना थांबविण्यासाठी सरकार, पोलीस, न्यायव्यवस्था आणि समाजाने आता केवळ आश्वासने नव्हे, तर ठोस कृती करण्याची वेळ आली आहे.

**– श्याम ठाणेदार**
**दौंड, जि.पुणे, ९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

### डोंगळहळदी येथे पिकअप व दुचाकीची धडक; दोघे गंभीर जखमी



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२२, पोंभुर्णा (चंद्रपूर) :** डोंगळहळदी येथे चंद्रपूर हायवेवर पिकअप वाहन आणि दुचाकीची जोरदार धडक होऊन अपघात झाला. या अपघातात दुचाकीवरील महिला व पुरुष दोघेही जखमी झाले असून, दोघांची प्रकृती गंभीर आहे.

अपघाताची माहिती मिळताच युवासेना उपजिल्हाप्रमुख महेश श्रीगिरीवार तसेच युवासेनेचे पदाधिकारी व सहकारी घटनास्थळी पोहोचले. त्यांनी तत्काळ जखमींना मदत करून पोंभुर्णा येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. सध्या जखमींवर उपचार सुरू आहेत.

यावेळी डोंगळहळदी येथील युवक राहुल सखलवार, कबुतर मेश्राम तसेच त्यांच्या सहकाऱ्यांनीही तत्काळ मदतीसाठी धाव घेतली. सर्वांनी मिळून जखमींना रुग्णालयात पोहोचविण्यासाठी मदत केली. त्यांच्या तत्परतेमुळे जखमींना वेळेत वैद्यकीय उपचार मिळण्यास मदत झाली.

### रेल्वेचे पत्र्याचे कंपाऊंड काढा; स्मशानभूमी व दफनभूमीकडे जाणारा मार्ग खुला करा...



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२२, पिंपरी-चिंचवड :** फुगेवाडी-कुंदननगर परिसरातील हिंदू स्मशानभूमी व मुस्लिम दफनभूमीकडे जाणारा पूर्वीचा मार्ग रेल्वे विभागाने पत्र्याचे कंपाऊंड उभारून बंद केल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. त्यामुळे रेल्वे विभागाने उभारलेले पत्र्याचे कंपाऊंड तातडीने काढून टाकावे आणि नागरिकांसाठी पूर्वीचा मार्ग खुला करावा, अशी ठाम मागणी मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग बारणे यांनी मध्य रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे केली. फुगेवाडी-कुंदननगर परिसरात सुमारे १२ ते १४ हजार नागरिक वास्तव्यास आहेत. परिसरातील नागरिकांच्या अंत्यविधीसाठी हिंदू स्मशानभूमी तसेच मुस्लिम समाजासाठी दफनभूमी उपलब्ध आहे. मात्र, रेल्वे विभागाने परिसराच्या दोन्ही बाजूंना पत्र्याचे कंपाऊंड उभारल्यामुळे स्मशानभूमी व दफनभूमीकडे जाणारे पूर्वीचे मार्ग बंद झाले आहेत. अंत्यविधीच्या वेळी मृतदेह घेऊन जाताना कुटुंबीय, नातेवाईक आणि नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अंत्यविधीसाठी जाणारा मार्ग हा कोणत्याही धर्माच्या नागरिकांसाठी अत्यंत संवेदनशील आणि मूलभूत मानवी गरजेचा विषय आहे. त्यामुळे या मार्गावर निर्माण झालेला अडथळा तातडीने दूर करणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर खासदार श्रीरंग बारणे यांनी मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक राजीव श्रीवास्तव, उपमहाव्यवस्थापक कृश किशोर मिश्रा, पुणे रेल्वे व्यवस्थापक राजेश कुमार वर्मा, प्रधान मुख्य वाणिज्य व्यवस्थापक प्रभात कुमार, प्रधान मुख्य अभियंता रजनीश मथुर तसेच मुख्य प्रशासकीय अधिकारी भुवनीय कुमार गुप्ता यांच्याकडे नागरिकांच्या या गंभीर समस्येबाबत मागणी केली.

रेल्वेने उभारलेले पत्र्याचे कंपाऊंड काढून पूर्वीचा नागरिकांचा मार्ग तातडीने खुला करावा. आवश्यक असल्यास सुरक्षित व कायमस्वरूपी प्रवेशमार्गाची व्यवस्था करावी. तसेच रेल्वेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी पाहणी करून नागरिकांच्या अडचणी समजून घ्याव्यात आणि विलंब न करता सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी खासदार बारणे यांनी केली. यावेळी युवासेना शहर संघटक निलेश हाके, रेल्वे बोर्ड सदस्य सुदर्शन देसले तसेच फुगेवाडी-दापोडी परिसरातील शिवसैनिक उपस्थित होते.

नागरिकांच्या अंत्यसंस्काराच्या मार्गातील अडथळा दूर करण्यासाठी खासदार श्रीरंग बारणे यांनी पुढाकार घेतल्याने या प्रश्नावर रेल्वे प्रशासनाकडून तातडीने कार्यवाही होण्याची अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

### एकल महिलांसाठी आज विशेष नोंदणी शिबिर; बाबाजी पाटील यांचे आवाहन...

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२२, पडले (ठाणे) :** विधवा, घटस्फोटित आणि एकल महिलांना शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी सोमवार, दि. २४ ऑगस्ट २०२६ रोजी ठाण्यात विशेष नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. बी.के वॉटर पार्क येथील बाबाजी पाटील जनसंपर्क कार्यालयात सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत हे शिबिर होणार असून, पात्र महिलांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन नगरसेवक बाबाजी बाळाराम पाटील यांनी केले आहे. हे शिबिर पडले-डायघर रोडवरील बी.के वॉटर पार्कजवळील जनसंपर्क कार्यालयात होणार आहे. या 'एकल महिला नोंदणी अभियाना'त पात्र महिलांची नोंदणी करून त्यांना शासनाच्या विविध योजनांशी जोडण्यात येणार आहे.

या नोंदणीसाठी महिलांनी आधार कार्ड, मतदान कार्ड, पॅन कार्ड, रेशन कार्ड आणि मोबाईल क्रमांक ही कागदपत्रे सोबत आणणे आवश्यक आहे.

एकल महिलांनी स्वावलंबी व्हावे आणि शासकीय योजना थेट गरजू महिलांपर्यंत पोहोचाव्यात या उद्देशाने या विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

### आठवडी बाजारातुन चोरट्यांनी महागडे मोबाईल फोन लांबविले

**अक्षराज : अशोक लोणीकर**

**दि.२२, मुखेड (नांदेड) :** मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद हे शहर प्रमुख बाजारपेठ म्हणून ओळखले जात असले तरी या शहराला वीस ते बावीस खेड्यांचा संपर्क नेहमी राहतो.कर्नाटक व तेलंगणाच्या शेजारला असल्या कारणाने मुक्रमाबाद शहराची बाजार पेठ व दर शुक्रवारी भरणारा आठवडी बाजार सर्व परिसरात परिचित आहे.याच संधीचा फायदा घेत आठवडी बाजारात मोबाईल चोरांचा सुळसुळाट सुरू असल्याने नागरिकांमध्ये चिंता वाढलेली आहे. दर शुक्रवारी भरणाऱ्या भाजीपाला बाजारात मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते. नेमका याच मोक्याचा फायदा घेत चोरटे नागरिकांच्या खिशातील मोबाईलवर हात साफ करत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत.

शुक्रवार, २१ ऑगस्ट रोजी पत्रकार शाकीर काजी आणि सामाजिक कार्यकर्ते सैलानी शेख हे भाजीपाला खरेदी करण्यासाठी बाजारात गेले असता गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी दोघांचेही मोबाईल चोरून नेल्याची घटना घडली. यापूर्वीही आठवडी बाजारात अनेक नागरिकांचे मोबाईल चोरीला गेल्याच्या घटना घडल्या आहेत. मात्र, या चोरट्यांचा अद्याप तपास लागला नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व भीतीचे वातावरण निर्माण होत आहे.मुक्रमाबादच्या आठवडी बाजारात परिसरातील अनेक शेतकरी, गोरगरीब नागरिक, कामगार खरेदी-विक्रीसाठी येतात. त्यामुळे मोबाईल चोरीच्या घटनांवर आळा घालण्यासाठी पोलीस प्रशासनाने बाजारपेठेत विशेष लक्ष देऊन चोरट्यांचा शोध घ्यावा, तसेच आठवडी बाजारच्या दिवशी पोलीस बंदोबस्त वाढवावी, अशी मागणी सर्वसामान्य नागरिकांकडून होत आहे.

## आडोशी येथील अपघातग्रस्त कुटुंबीयांची आ.हरिश्चंद्र भोये यांची सांत्वनपर भेट



**अक्षराज : निलेश कासट**

**दि.२२ जव्हार (पालघर) :** मोखाडा तालुक्यातील आडोशी येथील जिल्हा परिषद शाळेच्या पटांगणात इको कारच्या धडकेत १२ वर्षीय विद्यार्थिनी सोनम युवराज खरपडे हिचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या हृदयद्रावक घटनेनंतर सोनमच्या कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन करण्यात आले. तसेच कुटुंबाला आर्थिक मदत देऊन या दुःखाच्या प्रसंगी त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याची ग्वाही देण्यात आली.

दि.२० ऑगस्ट रोजी सकाळी सुमारे ९.४५ वाजण्याच्या सुमारास सोनम शाळेत जात असताना शाळेच्या पटांगणात भरधाव आलेल्या पांढऱ्या रंगाच्या इको कारने तिला जोरदार धडक दिली. या अपघातात सोनमच्या डोक्यासह छाती व हात-पायांना गंभीर दुखापत झाली. त्यातच तिचा जागीच मृत्यू झाला. सोनम ही इयत्ता सहावीमध्ये शिक्षण घेत होती. या घटनेने आडोशी गावावर शोककळा पसरली आहे.

**शाळेच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर**

या दुर्घटनेनंतर आडोशी जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. शाळेच्या परिसराला संरक्षण भिंत नसल्याने वाहन थेट शाळेच्या पटांगणात येण्याचा धोका असल्याचे ग्रामस्थांनी निदर्शनास आणून दिले आहे. शाळा व्यवस्थापन समिती तसेच ग्रामपंचायतीकडून यापूर्वीही कंपाऊंड वॉलची मागणी करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे.

सोनमच्या दुर्दैवी मृत्यूनंतर भविष्यात अशा प्रकारची दुर्घटना पुन्हा घडू नये, यासाठी शाळेच्या परिसराला तातडीने संरक्षण भिंत उभारणे, प्रवेशद्वाराची योग्य व्यवस्था करणे तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करणे गरजेचे आहे.

**प्रशासनाकडून पाहणी**

दरम्यान, घटनेची गंभीर दखल घेत जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) मातेकर यांनी आडोशी येथे भेट देऊन शाळेची पाहणी केली. शाळेच्या कंपाऊंड वॉलचा प्रस्ताव व्हीबी-जी राम जी (विकसित भारत रोजगार व आजीविका मिशन ग्रामीण) योजनेतून तातडीने सादर करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. तसेच सोनमच्या कुटुंबीयांना राजीव गांधी अपघात विमा योजनेअंतर्गत लाभ मिळवून देण्यासाठी कार्यवाही करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

**दोषींवर कठोर कारवाईची मागणी**

या घटनेप्रकरणी सोनमचे वडील युवराज विलास खरपडे यांनी मोखाडा पोलिस ठाण्यात फिर्याद दिल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

शाळा ही विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित जागा असणे अपेक्षित आहे. मात्र, शाळेच्या आवारातच विद्यार्थिनीचा बळी गेल्याने प्रशासनाने या घटनेकडे केवळ अपघात म्हणून न पाहता शाळांच्या सुरक्षिततेसंदर्भात ठोस उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे. आडोशी शाळेला तातडीने कंपाऊंड वॉलसह आवश्यक सुरक्षा व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन यावेळी देण्यात आले.

## कलासाधना सामाजिक संस्थेतर्फे राष्ट्रीय पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठवण्याचे आव्हान

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२२, नवी मुंबई :** कलासाधना सामाजिक संस्था, नवी मुंबई यांच्या वतीने यंदाही राष्ट्रीय पुरस्कार – २०२६ चे आयोजन करण्यात आले असून, विविध क्षेत्रांत उल्लेखनीय व प्रेरणादायी कार्य करणाऱ्या मान्यवरांकडून पुरस्कारासाठी प्रस्ताव आमंत्रित करण्यात आले आहेत. हा पुरस्कार सोहळा ५ सप्टेंबर २०२६ रोजी शिक्षक दिनाच्या निमित्ताने नवी मुंबई येथे आयोजित करण्यात येणार आहे.

या पुरस्कार सोहळ्यात 'कर्मवीर भाऊराव पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार – २०२६', 'राजा रवी वर्मा कलातपस्वी पुरस्कार' आणि 'भारत गौरवश्री पुरस्कार' अशा विविध पुरस्कारांनी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा गौरव करण्यात येणार आहे.

शिक्षण, आदर्श शिक्षक, पत्रकारिता, साहित्य, कला, चित्रकला, शिल्पकला, ललित कला, क्रीडा, संगीत, गायन, वादन, सामाजिक कार्य, औद्योगिक क्षेत्र, वैद्यकीय सेवा, उद्योजकता, कृषी, सहकार, धार्मिक व आध्यात्मिक कार्य, महिला व बालविकास तसेच इतर विविध क्षेत्रांत समाजासाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींना या पुरस्कारासाठी प्रस्ताव सादर करता येणार आहेत.

निवड झालेल्या पुरस्कारार्थींचा सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, मेडल व पुस्तक देऊन गौरव करण्यात येणार आहे. समाजासाठी निःस्वार्थपणे आणि सातत्याने कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या कर्तृत्वाची दखल घेऊन त्यांना राष्ट्रीय स्तरावर सन्मानित करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

Kalasadhana art academy

पुरस्कारासाठी प्रस्ताव सादर करू इच्छिणाऱ्या व्यक्तींनी आपला संपूर्ण परिचय, कार्याचा सविस्तर तपशील, पासपोर्ट साईज फोटो तसेच उपलब्ध असल्यास पुरस्कार, सन्मानपत्रे व कार्याची छायाचित्रे प्रस्तावासोबत पाठवावीत. प्रस्ताव पाठविण्याची अंतिम तारीख ३० ऑगस्ट २०२६ असून प्रस्ताव WhatsApp क्रमांक ७२०८१०१५८२ वर पाठविण्याचे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

कलासाधना सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा मेघा महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली या राष्ट्रीय पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात येत आहे. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेऊन आपले प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

कर्तृत्वाचा सन्मान समाजाचा अभिमान!या प्रेरणादायी विचारातून आयोजित करण्यात येणारा हा पुरस्कार सोहळा विविध क्षेत्रातील गुणवंत आणि कर्तृत्ववान व्यक्तींसाठी निश्चितच गौरवाचा ठरणार आहे.

## प्रशासनाने जागे होऊन विद्यार्थ्यांना न्याय द्यावा

### दिवा- फडके पाडा खार्डी-डावले मार्गावर TMT बससेवा तात्काळ सुरु करा

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२२, ठाणे (दिवा) :** कोविड काळात बंद करण्यात आलेली दिवा ते भारत गिअर कंपनी मार्गावरील ढचढ बससेवा तीन वर्षे झाली तरी सुरु झालेली नाही. यामुळे विद्यार्थी आणि ग्रामस्थांचे मोठे हाल होत आहेत. याची महापौर, उपमहापौर, आयुक्त आणि ठाणे परिवहन व्यवस्थापक यांनी तात्काळ दखल घेऊन बससेवा सुरु करावी, अशी मागणी होत आहे.

ही बससेवा पूर्वी दिवा स्टेशन - फडकेपाडा - तंत्रनिकेतन कॉलेज - डावलेगाव - खार्डी - भारत गिअर कंपनी या मार्गावर नियमित सुरु होती. कोविडमध्ये ती बंद करण्यात आली. पण आता जनजीवन पूर्ववत झाले तरी ही सेवा बंदच आहे.

**सर्वात जास्त फटका विद्यार्थ्यांना**



तंत्रनिकेतन कॉलेजच्या ५०० हून अधिक विद्यार्थ्यांना दिवा स्टेशनपासून ३.५ किलोमीटरचा रस्ता दररोज पायी किंवा जास्त पैसे देऊन रिक्षाने जावा लागत आहे. त्यामुळे त्यांचा वेळ आणि पैसा दोन्ही वाया जात आहे.

**ग्रामस्थ आणि कामगारांचे हाल**

डावलेगाव,फडकेपाडा, खार्डी, आणि भारत गिअर्स कंपनीत काम करणाऱ्या हजारो कामगारांना, महिला आणि वृद्ध ग्रामस्थांना थेट बस नसल्याने रोज ६० ते ८० रुपये जादा भाडे द्यावे लागत आहे.

समाजसेवक विनोद वास्कर यांनी २०२२ पासून या मार्गासाठी ढचढ प्रशासनाकडे पाठपुरावा केला आहे. ५ मे २०२६ रोजी त्यांनी पुन्हा स्मरणपत्र दिले आहे. तरी या मार्गावरील ५० हजार नागरिकांचा विचार करून ठाणे परिवहन विभागाने दिवा-तंत्रनिकेतन-डावले-भारत गिअर मार्गावरील बससेवा लवकरात लवकर पुनश्च सुरु करावी, अशी मागणी दिवा- फडके पाडा खार्डी-डावले परिसरातील ग्रामस्थांमधून होत आहे.

## मुख्यमंत्री फडणवीसांचे शाळा परिसर टपरीमुक्त करण्याचे कडक निर्देश

### पण दिवा आणि शिळ फाट्यात हप्तेखोरीमुळे कारवाई नाही

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२२, दिवा (ठाणे) :**

शाळा-महाविद्यालयांचा १०० मीटर परिसर टपरीमुक्त आणि ड्रग-फ्री करण्याचे कडक निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले असताना दिवा आणि शिळ फाट्यातील वास्तव वेगळेच आहे. नागरिक, पालक, सामाजिक संघटना आणि राजकीय पक्षांच्या शेकडो तक्रारींनंतरही महापालिका आणि पोलीस प्रशासन कारवाई करत नसल्याचा आरोप होत आहे.

**दिवा ते शिळ फाटा – तक्रारींनंतरही टपऱ्या जैसे थेच**

दिवा स्टेशन परिसर, मध्यवर्ती शाळा, महाविद्यालयांच्या गेटबाहेर आणि शिळ फाटा चौक व शिळ-दिवा रोडवरील शाळा-कॉलेजांच्या समोरच अनधिकृत पान-गुटखा टपऱ्या राजरोस सुरू आहेत.

प्रत्येक पान टपरी मागे दोन हजार रुपये हप्ता घेतला जात असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. त्यामुळेच केवळ नोटीस देऊन सोपस्कार पार पाडला जातो आणि दोन दिवसात त्याच ठिकाणी टपऱ्या पुन्हा सुरू होतात.

**गुटख्यामुळे सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता आणि रोगराईचा धोका**




शाळा, स्टेशन परिसर आणि सार्वजनिक ठिकाणी गुटखा, तंबाखू खाऊन सर्वत्र पिचकाऱ्या मारल्या जात आहेत. यामुळे भिंती, फुटपाथ, स्टेशनचे फलाट आणि शाळेच्या आवारातील परिसर अत्यंत अस्वच्छ झाला आहे.

गुटख्याच्या पिचकाऱ्यांमुळे परिसरात दुर्गंधी पसरत असून क्षयरोग (टीबी) सारख्या संसर्गजन्य आजारांची आणि रोगराई वाढण्याचा धोका निर्माण झाला आहे, असे आरोग्याबाबत जागरूक नागरिकांचे म्हणणे आहे. विद्यार्थ्यांमध्ये व्यसनाधीनता वाढण्यासोबतच सार्वजनिक आरोग्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे.

मुख्यमंत्र्यांच्या थेट आदेशानंतर तरी ठाणे महापालिका आयुक्त आणि पोलीस प्रशासन दिवा आणि शिळ फाटा परिसरात हप्तेखोरीची चौकशी करून प्रत्यक्ष अतिक्रमण हटाव मोहीम राबवणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# नकाशे - उतारे मिळेनात; भूमी अभिलेख कार्यालयाच्या कारभारावर शेतकऱ्यांच्या तक्रारी

## खासगी एजंटांच्या वावरासह अरेरावीच्या तक्रारी

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२२, पंढरपूर :** करमाळा तालुक्यातील भूमी अभिलेख कार्यालयातील कारभाराबाबत शेतकऱ्यांकडून गंभीर तक्रारी पुढे येत असून, जमिनीचे नकाशे, उतारे व इतर महत्त्वाचे अभिलेख मिळविण्यासाठी नागरिकांना हेलपाटे मारावे लागत असल्याचा आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे करमाळा तालुकाध्यक्ष संजय (बापू) घोलप यांनी केला आहे. जमिनीशी संबंधित विविध कामांसाठी आवश्यक असलेले नकाशे, उतारे व अभिलेख मिळविण्यासाठी अनेक शेतकरी गेल्या काही दिवसांपासून भूमी अभिलेख कार्यालयाच्या फेऱ्या मारत आहेत.

मात्र, संबंधित कागदपत्रे उपलब्ध नसल्याचे सांगून त्यांना परत पाठविले जात असल्याच्या तक्रारी मनसेकडे प्राप्त



झाल्या आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांची कामे रखडत असून, त्यांना वेळ आणि पैशांचा नाहक भुर्दंड सहन करावा लागत असल्याचे घोलप यांनी म्हटले आहे.

**'पैसे दिल्यास काम लवकर'च्या आरोपाने खळबळ**

कार्यालयाच्या परिसरात खासगी एजंटांचा मोठ्या प्रमाणात वावर असल्याची तक्रारही नागरिकांनी केली आहे. पैसे दिल्यास कामे जलद होतात, अन्यथा कागदपत्रांसाठी अनेक दिवस प्रतीक्षा करावी लागते, असे गंभीर आरोप शेतकऱ्यांकडून करण्यात येत असल्याचे मनसेने म्हटले आहे. तसेच काही अधिकारी व कर्मचारी नागरिकांशी अरेरावीच्या भाषेत बोलत असल्याच्या तक्रारी ही समोर आल्या आहेत.या संपूर्ण प्रकाराची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने दखल घेऊन भूमी अभिलेख कार्यालयातील कामकाजाची सखोल चौकशी करावी. कागदपत्रे उपलब्ध नसतील तर ती नेम की कुठे आहेत, अभिलेख गहाळ झाले आहेत का, याची तपासणी करून दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी संजय (बापू) घोलप यांनी केली आहे.

**'अभिलेख उपलब्ध नाही'चे लेखी प्रमाण घ्या**

ज्या शेतकऱ्यांना नकाशे, उतारे किंवा अन्य कागदपत्रे मिळत नाहीत, त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे लेखी मागणी करावी. कागदपत्रे उपलब्ध नसल्यास 'सदर नकाशे/उतारे आढळून येत नाहीत' असे स्पष्ट लेखी स्वरूपात देण्याची मागणी करावी, असे आवाहन मनसेने केले आहे. यामुळे भविष्यातील पाठपुराव्यासाठी शेतकऱ्यांकडे अधिकृत पुरावा उपलब्ध राहणार असल्याचे घोलप यांनी सांगितले.

शेतकऱ्यांच्या हक्कासाठी आणि शासकीय कार्यालयातील कथित गैरप्रकारांविरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेना करमाळा तालुक्यात शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभी राहणार असुन शेतकऱ्यांनी अडचण असल्यास ९०१११४८०७७७ संजय (बापू) घोलप, तालुकाध्यक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, करमाळा संपर्क साधावा असे आवाहन त्यांनी केले आहे.

# प्रहार सामाजिक संघटनेच्या पाठपुराव्याला अखेर यश

## हवा प्रदूषण प्रकरणी दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाईचे विधानसभा उपाध्यक्ष बनसोडे यांचे निर्देश

**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.२२, पनवेल (नवी मुंबई) :** पनवेल महानगरपालिका क्षेत्रात बांधकाम व्यावसायिकांकडून मोठ्या प्रमाणात नियमांचे उल्लंघन करून होणाऱ्या हवा प्रदूषणाच्या गंभीर प्रकरणाची विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी दखल घेतली आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या विकासकांवर कठोर कारवाई करण्यासह या प्रकरणात दिरंगाई व निष्काळजीपणा करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करून अहवाल सादर करण्याचे निर्देश त्यांनी पनवेल महानगरपालिका आयुक्त व नगरविकास विभागाला दिले आहेत.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात सुरू असलेल्या विविध बांधकाम प्रकल्पांमुळे मोठ्या प्रमाणात धूळ व हवा प्रदूषण होत असून त्याचा नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याचा आरोप प्रहार सामाजिक संघटनेने केला होता. याबाबत संघटनेच्या वतीने पालिका आयुक्तांकडे वारंवार निवेदने व तक्रारी करून संबंधित बांधकाम व्यावसायिकांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली होती.

या प्रकरणात महानगरपालिकेच्या नगररचना विभागाने कारवाईचा देखावा करत हवा प्रदूषण करणाऱ्या ५२ विकासकांना काम बंद करण्याच्या नोटिसा बजावल्या होत्या. मात्र, या नोटिसांना न जुमानता संबंधित विकासकांकडून नियमांचे उल्लंघन करून अनधिकृतपणे बांधकाम सुरूच ठेवण्यात आल्याचा आरोप प्रहार संघटनेने केला आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांच्या आरोग्याशी व जीवाशी खेळ सुरू असल्याची तक्रार संघटनेने विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्याकडे केली होती.

> हवा प्रदूषणामुळे पनवेल शहरातील नागरिकांना मोठा फटका बसत असून आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. असे असताना ही पालिका प्रशासन या विषयाकडे पुरेसे गांभीर्याने पाहत नसल्याचा आरोप प्रहार संघटनेने केला आहे. विधानसभा उपाध्यक्षांनी या प्रकरणात कारवाईचे स्पष्ट निर्देश दिले असून त्याची तातडीने अंमलबजावणी झाली नाही, तर नागरिकांच्या हितासाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल करून न्याय मागण्यात येईल.
>
> **-डॉ. सुनील शिरीषकर (रायगड जिल्हाध्यक्ष, प्रहार सामाजिक संघटना)**

या तक्रारीची गंभीर दखल घेत विधानसभा भवनात संबंधित प्रकरणाची बैठक व सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीदरम्यान पनवेल महानगरपालिकेने प्रथमदर्शनी नियमांचे उल्लंघन झाल्याचे मान्य केले. त्यानंतर नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ५४ विकासकांच्या बांधकाम परवान्यांबाबत नियमानुसार आवश्यक कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले.तसेच या प्रकरणात कारवाई करण्यास दिरंगाई करणाऱ्या व निष्काळजीपणा करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर उचित नियमांनुसार कारवाई करून त्याबाबतचा अहवाल सादर करण्याचे निर्देश विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी पनवेल महानगरपालिका आयुक्त व नगरविकास विभागाला दिल्याची माहिती प्रहार संघटना रायगड जिल्हाध्यक्ष डॉ.सुनील शिरीषकरयांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकातून दिली आहे.


# जिल्ह्यातील २.७० लाखांवर मतदारांची नावे वगळली जाण्याची शक्यता

## १ ऑक्टो २०२६ रोजी १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या नवमतदारांना नाव नोंदण्याची संधी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२२, चंद्रपूर :** भारत निवडणूक आयोग व मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशानुसार, चंद्रपूर जिल्ह्यात मतदार याद्यांची 'विशेष सखोल पुनरीक्षण' मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेंतर्गत जिल्ह्यात मयत, कायमस्वरूपी स्थलांतरित, अनुपस्थित किंवा अन्यत्र/दुबार नोंद असलेले सुमारे २ लाख ७० हजार इतके मतदार नियमानुसार / प्रत्यक्ष वस्तुस्थितीनुसार प्रारूप मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट करण्यास अपात्र असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे त्यांना अनकलेक्टेबल ई.एफ. या गटात समाविष्ट करण्यात आले आहे. या २ लक्ष ७० हजार १९५ मतदारांमध्ये, आढळून न आलेल्या मतदारांची संख्या २८ हजार ५८१, कायमस्वरुपी स्थलांतरीत १ लक्ष ६२ हजार ८५३, मृत ५१ हजार ९१३, अन्यत्र नोंदणी केलेले / दुबार २५ हजार ५९८, इतर १२५० मतदार आहेत.

या गटातील मतदारांच्या तात्पुरत्या याद्या १२ ऑगस्ट, २०२६ रोजी जिल्हा कार्यालयाचे चांदा.एनसी. इन वर प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. सदर याद्यांमधील मतदारांपैकी कोणत्याही मतदाराबाबत राजकीय पक्षांच्या संबंधित मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींकडून (बीएलए) माहिती दिल्यास, संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत (बीएलओ) माहितीची पडताळणी करून त्याचे



गणना प्रपत्र भरून घेण्याच्या सूचना देण्यात आलेल्या होत्या.

जिल्ह्यातील मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण आणि प्रारूप मतदार यादी तयार करण्याची तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी नवीन वेळापत्रक लागू करण्यात आले असून, जिल्ह्यातील प्रारूप मतदार यादी आता ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे.

**जिल्ह्यात ८४.९७ टक्के मतदारांची प्रत्यक्ष पडताळणी पूर्ण :** जिल्ह्यात ३० जून ते १७ ऑगस्ट २०२६ या कालावधीत २,०७६ मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत घरोघरी जाऊन गणना प्रपत्र भरून घेण्याची मोहीम राबविण्यात आली. त्यानुसार जिल्ह्यातील एकूण नोंदणीकृत मतदार १७ लक्ष ९७ हजार ६५५ आहे. गणना प्रपत्र भरून पडताळणी पूर्ण झालेले मतदार १५ लक्ष २७ हजार ४६० (८४.९७ टक्के) आहे. मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण, ३ नवीन केंद्रांची निर्मिती तर १३ केंद्रांचे विलीनीकरण मतदारांच्या सोयीसाठी १३०० पेक्षा जास्त मतदार शिल्लक असलेल्या ठिकाणी ३ नवीन उप-मतदान केंद्र तयार करण्यात आली आहे. कमी मतदार असलेली १३ केंद्र विलीन करण्यात आली असून सुसूत्रीकरणाअंती जिल्ह्यात आता एकूण २०६६ मतदान केंद्र निश्चित करण्यात आले आहेत.

विशेष सखोल पुनरीक्षणाचे (एसआयआर) सुधारित वेळापत्रक : १) मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण व पुनर्रचना - २४ ऑगस्ट २०२६ पर्यंत, २) प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करणे - ३१ ऑगस्ट २०२६, ३) दावे व हरकती स्वीकारण्याचा कालावधी - ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२६, ४) नोटीस व दावे/हरकती निकाली काढणे - ३१ ऑगस्ट ते २९ ऑक्टोबर २०२६, ५) अंतिम मतदार यादी प्रसिद्धी - ०४ नोव्हेंबर २०२६ ३१ ऑगस्टपासून महिनाभर दावे व हरकती नोंदवण्याची संधी ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर शासकीय कार्यालयांच्या सूचना फलकावर तसेच अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली जाईल. त्याचप्रमाणे सदरहू मतदार याद्या मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना सॉफ्ट व हार्ड कॉपीच्या स्वरूपात उपलब्ध करून देण्यात येतील.

ज्यांची नावे प्रारूप मतदार यादीमध्ये नियमानुसार समाविष्ट करता आली नाहीत, अशा अनकलेक्टेबल गटातील मतदारांच्या याद्या संबंधित शासकीय कार्यालयांच्या सुचना फलकावर तसेच जिल्हा निवडणूक अधिकारी किंवा मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या संकेतस्थळावर सुध्दा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. ज्या पात्र नागरिकांची नावे प्रारूप यादीत समाविष्ट झालेली नसतील किंवा ज्या मतदारांचे वय ०१ ऑक्टोबर २०२६ या अर्हता दिनांकास १८ वर्षे पूर्ण होत आहे, अशा नवमतदारांना मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी नमुना क्र. ६ (घोषणापत्र व आवश्यक कागदपत्रांसह) भरता येईल.

मतदार यादीतील नोंदींमध्ये दुरुस्तीसाठी नमुना क्र. ८ तर अपात्र नावांबाबत आक्षेप/वगळणीसाठी नमुना क्र. ७ भरून देता येईल. हे अर्ज मतदार सेवा पोर्टलद्वारे (ऑनलाइन) किंवा संबंधित बीएलओ मतदार नोंदणी अधिकारी यांच्याकडे ऑफलाइन सादर करता येतील.जिल्हा प्रशासनाचे आवाहन चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी ३१ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध होणाऱ्या प्रारूप मतदार यादीमध्ये आपले व आपल्या कुटुंबीयांचे नाव असल्याची खात्री करावी. नाव नसल्यास अथवा दुरुस्ती असल्यास ३० सप्टेंबर २०२६ पूर्वी विहित नमुन्यात दावे व हरकती दाखल करून आपले नाव मतदार यादीत नोंदवून घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वसुमना पंत यांनी केले आहे.

## थोडक्यात बातम्या

# पिंप्रीतील बायो पॅलेट युनिटची आमदार चित्राताई वाघांकडून पाहणी



**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.२२, शिरपूर (धुळे) :** शेतातील काडी-कचरा, कृषी अवशेष आणि जैविक टाकाऊ पदार्थांपासून बायो पॅलेट तयार करून त्यातून ग्रामीण महिलांसाठी रोजगार व उत्पन्नाचे साधन निर्माण करण्याचा नावीन्यपूर्ण उपक्रम पिंप्री येथे राबविण्यात येत आहे. महिला आर्थिक विकास महामंडळाच्या (माविम) माध्यमातून मानव विकास मिशनच्या नावीन्यपूर्ण योजनेअंतर्गत ९० टक्के अनुदानावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या या बायो पॅलेट युनिटला भारतीय जनता पक्षाच्या महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षा तथा आमदार. चित्राताई किशोर वाघ यांनी नुकतीच भेट देऊन पाहणी केली. यावेळी माजी महापौर, धुळे जयश्री अहिरराव उपस्थित होत्या. पिंप्री येथील मनोज उमेशसिंग राजपूत यांच्या शेतात हे युनिट कार्यरत असून, त्याचे संचालन जय किसान महिला बचत गटामार्फत केले जाते. शेतातील काडी-कचरा, विविध कृषी अवशेष तसेच इतर जैविक टाकाऊ पदार्थांचा उपयोग करून या युनिटमध्ये बायो पॅलेट तयार केले जातात. तयार बायो पॅलेटची विक्री करून बचत गटातील महिलांना उत्पन्न मिळत आहे. त्यामुळे कृषी अवशेषांचा योग्य वापर होण्याबरोबरच त्यांचे मूल्यवर्धित उत्पादनात रूपांतर होत असून, पर्यावरणपूरक इंधननिर्मितीलाही चालना मिळत आहे. आमदार चित्राताई वाघ यांनी युनिटची पाहणी करताना बायो पॅलेट निर्मितीसाठी वापरण्यात येणारा कच्चा माल, उत्पादन प्रक्रिया, तयार मालाची विक्री आणि महिलांना मिळणारे आर्थिक उत्पन्न याबाबत माहिती जाणून घेतली. त्यांनी बचत गटातील महिलांशी संवाद साधून त्यांच्या अनुभवांची माहिती घेतली. महिलांच्या माध्यमातून कृषी अवशेषांचा प्रभावी वापर करून राबविण्यात येत असलेल्या या उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले. या उपक्रमाच्या कार्यासाठी लोकसंचालित साधन केंद्राच्या व्यवस्थापक नीता बाविस्कर यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभत आहे. यावेळी माविमचे धुळे जिल्हा समन्वय अधिकारी जगन्नाथ वानखेडकर, सहनियंत्रण अधिकारी मिलिंद पाटील, सीएमआरसी व्यवस्थापक नीता बाविस्कर, सीएमआरसी सचिव मालती सूर्यवंशी, सीएमआरसी लेखापाल प्रशांत बारी, सीएमआरसी सहयोगिनी कल्पना माळी, रविता पावरा व शिल्पा चव्हाण उपस्थित होत्या. तसेच जय किसान महिला बचत गटातील नीलिमा राजपूत, राजश्री राजपूत, वंदना राजपूत, संगीता कोळी व सपना यांच्यासह बचत गटातील महिला उपस्थित होत्या.

याप्रसंगी पिंप्रीचे माजी सरपंच महेंद्रसिंग सिसोदिया, संजय सरदार धनगर, किशोर राजपूत, पोलीस पाटील जयपालसिंह गिरासे, माजी उपसरपंच जितेंद्र कोळी, रामसिंग धनसिंग राजपूत, महेंद्र भगवानसिंग गिरासे, गोटु ओंकार राजपूत, माजी प.स.सदस्य विजय खैरनार, राजकुमार गिरासे, अनिल गिरासे, इंद्रसिंग गिरासे, राकेश गिरासे, स्वप्निल राजपूत, हरीश राजपूत, निंबा राजपूत, दिलीप कोळी, अर्जुन भिल, अक्षय राजपूत, अविनाश कोळी, जितेंद्र धनगर, यांच्यासह पिंप्रीतील पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते. कृषी अवशेषांचा पुनर्वापर, पर्यावरण संवर्धन, मूल्यवर्धित उत्पादन निर्मिती आणि ग्रामीण महिलांना रोजगार व स्वयंरोजगाराची संधी, अशा विविध बाबींची सांगड घालणारा पिंप्रीतील हा उपक्रम ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देणारा ठरत असून, महिला बचत गटांच्या माध्यमातून अशा नावीन्यपूर्ण उपक्रमांना चालना मिळाल्यास कृषी अवशेष व्यवस्थापनासोबतच ग्रामीण महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला ही मोठी गती मिळू शकते.

# लासलगाव पोलीस व नूतन विद्यालयाचा उपक्रम; 'नशामुक्त जीवन' चित्रकला स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद




**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२२, विंचूर (नाशिक) :** विद्यार्थ्यांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती निर्माण व्हावी आणि समाजात सकारात्मक संदेश पोहोचावा, या उद्देशाने लासलगाव पोलीस स्टेशन व नूतन विद्यालय (खडक माळेगाव) यांच्या संयुक्त विद्यमाने 'नशामुक्त जीवन' या विषयावर चित्रकला स्पर्धा उत्साहात पार पडली. लासलगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर कोते यांच्या संकल्पनेतून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत इयत्ता ५ वी ते ७ वी आणि ८ वी ते १० वी अशा दोन गटांमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेतून आणि रंगांच्या माध्यमातून नशेमुळे व्यक्ती, कुटुंब व समाजावर होणारे विपरीत परिणाम प्रभावीपणे कागदावर रेखाटले. दोन्ही गटांतील सर्वोत्कृष्ट चित्रांची निवड करण्यात आली असून सहभागी सर्व विद्यार्थ्यांना लासलगाव पोलिसांच्या वतीने सन्मानपत्र दिले जाणार आहे. या सर्व चित्रांचे प्रदर्शन मंगळवारी लासलगाव येथील भगरीबाबा मंदिर येथे भरवण्यात येणार आहे. यावेळी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विजेत्या विद्यार्थ्यांना नाशिक ग्रामीणच्या अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती विमला एम. यांच्या हस्ते बक्षिसे देऊन गौरविले जाईल. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी नूतन विद्यालयाच्या मुख्याध्यापिका मंजुषा रायते, कलाशिक्षक सुनील शेंद्रे आणि पोलीस पाटील वैशाली बाजारे यांनी परिश्रम घेतले.

# साहित्यिक प्रा.अशोक नाना आरे यांना राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

**अक्षराज : अक्षय गिरा**

**दि.२२, शहापूर (ठाणे) :** लेखक, कवी, कथाकार, कादंबारीकर अशा विविध साहित्य प्रकारात लेखन करणारे साहित्यिक प्रा.अशोक मंगी नाना आरे मनाचीवाडी (नडगांव) यांना कला क्षेत्रासाठी संगमनेरच्या जाणीव प्रतिष्ठानतर्फे लोकनेते बाळासाहेब थोरात राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाला आहे. त्यांच्या आजवरच्या शेक्षणिक आणि साहित्यिक योगदानाची दखल घेत हा सन्मान देण्यात आला आहे. प्रा.अशोक आरे हे विद्या प्रसारक मंडळाच्या शहा चंदूलाल सरुपचंद माध्यमिक उच्चं माध्यमिक विद्यालय किन्हवली येथे सहाय्यक शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. ते एम.ए.बी.एड सेट नेट असे उच्चं शिक्षित आहेत. आजपर्यंत आपल्या अध्यापनातून त्यांनी अनेक विद्यार्थी घडवले आहेत. शिक्षण प्रवाहातून बाहरे पडलेल्या अनेक गोरगरीब आदिवासी मुलांना सरांनी शिक्षणाच्या प्रवाहात आणलं आहे. सरांच्या प्रतिभासंपन्न लेखणीतून आजपर्यंत आठ पुस्तकं प्रकाशित झाली आहेत. गंध मातीचा, उपकार, आधार हे कवितासंग्रह, मनातील भूत, मुल्हारी, जाणीव हे कथासंग्रह तर पारू आणि फेड या कादंबाऱ्या आहेत.